दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184
▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ९७ वा ▶ रविवार दि. ११ फेब्रुवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला



संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### आता रेशनसोबत मिळणार साडी, पाटलांची घोषणा

**मुंबई ।** दारिद्र्य रेषेखालील महिलांना रेशन दुकानात आता रेशनसोबत साडी देखील मिळणार असल्याचे वक्तव्य राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केलं. रेशनसोबत मिळणारी साडी ही मालेगावातून मिळणार आहे. येवला येथील शाल, पैठणी, घोंगडी आदी पाच वस्तू तयार करणाऱ्या कारागिरांची नोंदणी करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले. यंत्रमागधारकांना काम मिळावे म्हणून साडी तयार करणार असल्याचे पाटील म्हणाले. वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील हे नाशिक जिल्ह्यातील मालेगाव दौऱ्यावर आहेत. यावेळी ते बोलत होते.

### देवळा स्वामी समर्थ मंदिरात मूर्तीची चोरी

**नाशिक ।** येथील पोलिस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या येथील स्वामी समर्थ केंद्रात गुरुवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी स्वामी समर्थांची मूर्ती चोरून नेली व दानपेटी फोडून त्यातील जवळपास ५० ते ६० हजार रुपये चोरून नेले आहे. हा प्रकार शुक्रवारी मंदिराचे सेवेकरी किशोर आहेर हे आपल्या नित्यनियमानुसार मंदिरात पूजा करण्यासाठी गेल्यावर त्यांच्या लक्षात आला. दरम्यान, दुर्गामाता मंदिरातील दानपेटी फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु, तो अयशस्वी ठरल्याचे समजले. या दानपेटीची एक चावी दिंडोरी संस्थानकडे असते व एक आमच्याकडे असते. ही पेटी खोलून रिकामी करण्यात येणार होती. मात्र त्याआधी अज्ञात चोरट्यांनी दानपेटी फोडून त्यातील रकमेचा व मूर्तीची चोरी केल्याने खळबळ उडाली आहे.

# उद्धव ठाकरेंच्या डोक्यावर परिणाम झाला ; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे वक्तव्य

### मी गेट वेल सून एवढेच म्हणेन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलेली टीका जोरकसपणे फेटाळून लावली आहे. उद्धव ठाकरे यांची भाषा व शब्द पाहिले असता त्यांच्या डोक्यावर परिणाम झाल्याचे माझे ठाम मत बनले आहे. त्यामुळे केवळ मी गेट वेल सून असे म्हणेन, असे ते म्हणालेत.



### उद्धव ठाकरे नेमकं काय म्हणाले?

**फडणवीस मृत्यू झालेल्या व्यक्तीची तुलना श्वानाशी करतात. मी त्यांच्यासाठी यापूर्वी वापरलेले 'कलंक', 'फडतूस' हे शब्द खूप सौम्य आहेत. त्यांची मानसिक तपासणी करावी का, हा प्रश्न आता निर्माण झाला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी श्वान हा संस्कृत शब्द वापरला याचा अर्थ ते सुसंस्कृत आहेत, असा होत नाही. त्यांचे वक्तव्य हे निर्ढावलेपणाचे लक्षण आहे, अशी टीका ठाकरे यांनी केली होती.**

### विजय वडेट्टीवार यांना देवेंद्र फडणवीसांचे प्रत्युत्तर

**राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अभिषेक घोसाळकर यांच्यावरील हल्लाप्रकरणात सत्ताधारी पक्षातील महिला किंवा पुरुष प्रवक्त्याचा हात असल्याचा आरोप केला होता. त्याला प्रत्युत्तर देताना फडणवीसांनी म्हटले की, विजय वडेट्टीवार यांना फार काही माहिती नसते. ते काहीही बोलत असतात. अभिषेक घोसाळकर हत्याप्रकरणाची चौकशी होईल. पण अलीकडच्या काळात जे गोपीचंद जासूस, जग्गा जासूस तयार झालेत त्यांना सांभाळून बोलावे, असा सल्ला देवेंद्र फडणवीसांनी वडेट्टीवारांना दिला.**

उद्धव ठाकरे यांनी शनिवारी राज्यात गत काही दिवसांपासून सुरू असलेल्या गुन्हेगारीच्या घटनांवरून राज्य सरकारवर तिखट हल्ला चढवला. महाराष्ट्रात गत काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या अनेक घटना घडल्या. पण काल गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या वक्तव्यानंतर त्यांच्यासाठी माझ्याकडे शब्दच उरले नाहीत. मी त्यांच्यासाठी वापरलेले फडतूस - कलंक आदी शब्द फारच सौम्य आहेत. आता महाराष्ट्राला मनोरुग्ण गृहमंत्री लाभाला आहे का? असा प्रश्न पडत आहे, असे ते आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले होते. उद्धव ठाकरे यांच्या या टीकेला देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, राज्यात घडलेल्या घटना निश्चितच गंभीर आहेत. पण त्या वैयक्तिक वैमनस्यातून घडल्या आहेत. त्यामुळे त्यांचा कायदा - सुव्यवस्था व राज्याच्या परिस्थितीशी संबंध जोडणे चुकीचे आहे. सरकार याविषयी कठोर कारवाई करत आहे. उद्धव ठाकरे यांची भाषा व त्यांचे शब्द पाहिले असता त्यांच्या डोक्यावर परिणाम झाल्याचे माझे ठाम मत झाले आहे. त्यामुळे मी त्यांना केवळ गेट वेल सून असे म्हणेन, असेही ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना म्हणाले. अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येमागे सत्ताधारी पक्षातील महिला किंवा पुरुष प्रवक्त्याचा हात असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला होता. फडणवीस म्हणाले, की वडेट्टीवारांना फारसं काही माहिती नसतं, ते उगाच काहीतरी सनसनाटी बोलत असतात, मात्र या प्रकरणाची चौकशी होईल. कोणीही उठून विनाकारण गोपीचंद जासूस, जग्गा जासूस तयार होऊ लागले आहेत, असंही फडणवीस म्हणाले.

# नाशिक येथे जलरथ अभियानाचा भव्य शुभारंभ



**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

फडणवीस साहेब असा माणूस आहे की, आम्हाला ओढून आणले आणि घड्याळही बंद केले. विनाकागदाचा बोलणारा नेता म्हणजे फडणवीस आहे, यांच्या डोक्यात १५-२० कॉम्प्युटर आहे असं वाटते, सभागृह गोल फिरवून टाकतात, असे वक्तव्य मंत्री गुलाबराव पाटीलयांनी केले आहे.

जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन टप्पा २ अंतर्गत जलरथ उद्घाटन सोहळा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिकच्या कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा हॉल येथे पार पडला. यावेळी गुलाबराव पाटील बोलत होते. मंत्री गिरीश महाजन , पालकमंत्री दादा भुसे हे देखील कार्यक्रमात उपस्थित होते. फडणवीस साहेब तुमचे आभार मानतो. जलरथ उद्घाटनासाठी संधी तुम्ही उपलब्ध करून दिली. शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले तर अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. मध्यंतरीच्या काळात मागचे अडीच वर्ष जलयुक्तचे काम झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. डिझेलसाठी डीपीडीसीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. थेंब आणि थेंब वाया जाणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे. जलरथच्या योगदानाबाबत भारतीय जैन संघटनेचे आभार मानतो, असे पालकमंत्री दादा भुसे म्हणाले. जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन टप्पा २ अंतर्गत जलरथ उद्घाटन सोहळा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिकच्या कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा हॉल येथे पार पडला.

# जमावबंदी कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी भाजपा जिल्हाध्यक्षांसह पदाधिकाऱ्यांवर गुन्हा

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

कुठलीही पुर्व परवानगी न घेता बेकायदेशिररित्या जमाव जमवुन खा.राहुल गांधी यांच्या विरोधात काल भाजपा धुळे जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या नेतृत्वात पुतळा दहन आंदोलन करण्यात आले. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांचेसह १५ ते २० पदाधिकार्यांवर जमावबंदी कायदा उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

खा.राहुल गांधी यांच्या आक्षेपार्ह वक्तव्याचा भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या नेतृत्वात खा.राहुल गांधी यांचा पुतळा दहन करून निषेध करण्यात आला. मात्र या निषेध आंदोलनकरीता जिल्हाधिकारी अथवा कोणत्याही विभागाची पुर्व परवानगी घेतलेली नव्हती. या निषेध मोर्चात भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांचेसह भाजयुमो जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी, माजी महापौर प्रतिभा चौधरी, प्रदीप कर्पे, जयश्री अहिरराव, युवा मोर्चा संघटन सरचिटणीस पंकज धात्रक, राजेंद्र खंडेलवाल, उपाध्यक्ष किशोर जाधव, रजनीश निंबाळकर, सुबोध पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष वैशाली शिरसाठ, सरचिटणीस मोहिनी धात्रक यांचेसह १५ ते २० कार्यकर्त्यांचा समावेश होता. दरम्यान, यापुर्वी धुळे जिल्हा पोलीस दलातर्फे पुतळा दहन करून नये, याबाबत वेळोवेळी सुचित केले होते. असे असतांना खा.राहुल गांधी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास जोडेमारो आंदोलन करून दहन करण्यात आले. या फिर्यादीवरून धुळे शहर पोलीस ठाण्यात पोहेकॉ अविनाश पवार यांचे फिर्यादीवरून महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपास पोना बागुल करीत आहेत.

## फिरदोसनगरमध्ये आ.फारुख शाह यांच्या हस्ते झाला वॉल कंपाऊंडच्या कामाचा शुभारंभ

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना अंतर्गत प्र. क्र.१३ फिरदोस नगर स.न.३७९/२ फा. प्लॉट ६६ खुल्या जागेस वॉल कंपाऊंड बांधणे या २५ लक्ष रुपये खर्चाच्या कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे शुभहस्ते संपन्न झाला.

धुळे शहरातील प्रमुख समस्या असलेल्या अनेक मूलभूत सुविधांच्या कामासाठी आ.फारुख शाह यांनी करोडो रुपयांच्या निधी नागरिकांच्या विकासासाठी आजपर्यंत आणलेला आहे. । कार्यक्रमास अलहाज अफ्फान अन्सारी, सलीम शाह, मौलवी शकील, ज्येष्ठ नेते साबीर शेठ, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक मुक्तार अन्सारी, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक आमिर पठाण, डॉ. दीपश्री नाईक, छोटू मच्छीवाले ,प्यारेलाल पिंजारी, इब्राहीम पठाण, युसुफ पापा सर,अर्शद पठाण, रशीद अन्सारी, इकबाल शाह, रेहान शेख, निजाम सय्यद, आसिफ शाह, सुफी हाजी, हारूण खाटीक, डॉ.बापुराव पवार, हालिम शमसुद्दिन, अशपाक खाटीक, आलिया गौहर मॅडम यांनी प्रयत्न केले.

## छगन भुजबळ यांना ठार मारण्याची धमकी : नाशिकच्या कार्यालयात पत्र

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



सध्या राज्यात गुंडाराज सुरू असून राज्यात एका पाठोपाठ एक गोळीबार होत आहे. अशा परिस्थितीत आता नाशिकमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. मंत्री छगन भुजबळ यांची पाच जणांना सुपारी दिली असून त्यांच्या जीवाला धोका असल्याचे पत्र त्यांच्या नाशिकच्या कार्यालयात आले आहे. छगन भुजबळ यांचा ठार करण्याची धमकी देण्यात आली आहे.

मंत्री छगन भुजबळ यांच्या जीवाला धोका असल्याची खळबळजनक घटना समोर येत आहे. छगन भुजबल यांना ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. तर या संदर्भातील एक पत्र छगन भुजबळ यांच्या नाशिकच्या कार्यालयात आलं आहे. या पत्रात मंत्री छगन भुजबळ यांच्या जीवाला धोका असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी पाच जणांनी घेतल्याचा उल्लेखही या पत्रात करण्यात आला आहे.

## खेतिया–शहादा रस्त्यावर १ लाखाचा गुटखा जप्त

**नंदुरबार । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

खेतिया-शहादा रस्त्यावर सुलतानपूर फाटा येथे सार्वजनिक जागी एक लाख रुपये किमतीच्या गुटखा म्हसावद पोलिसांनी पकडला असून, संशयित आरोपीस अटक करून गुन्हा नोंद केला आहे.

रिक्षा तपासणी केली असता त्यात एक लाख ८९६ किमतीच्या एकूण पाच निळ्या रंगाच्या मोठ्या गोण्या, त्यात प्रत्येकी ५२ केसरयुक्त विमल पानमसाला गुटख्याचे पाउच असे एकूण २६० पाउच, एकूण चार लाख ८९६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

भावपूर्ण श्रध्दांजली..!



स्व.प्रभाकरराव तुकाराम चव्हाण

यांचे शनिवार दि. १० रोजी सकाळी ७ वाजता निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच जिल्हा बँक परिवारातर्फे परमेश्वर चरणी प्रार्थना...

श्रद्धावनंत

दिपकभाई पाटील (उपाध्यक्ष)
राजवर्धनजी कदमबांडे (अध्यक्ष)

संचालक मंडळ

शिरीषकुमार नाईक
आमशादादा पाडवी
शामकांतजी सनेर
राजेंद्रजी देसले
सौ. शीलाताई पाटील
चंद्रकांतजी रघुवंशी
भरतभाऊ माळी
हर्षवर्धनजी दहिते
अमरसिंगदादा गावीत
सौ.सिमाताई रंधे
हरसिंगदादा पाडवी
प्रा. शरद पाटील
दर्यावगीरजी मंहत
भगवानभाऊ पाटील
संदीपदादा वळवी
डॉ. संजय पाटील

सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग धुळे व नंदुरबार जिल्हा बँक, धुळे

## नाशिकचे सीपी चांगलं काम करतायत : देवेंद्र फडणवीस

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



नाशिकच्या सातपूर पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचे उद्घाटन फीत कापून गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. यावेळी त्यांच्यासमवेत मंत्री गिरीश महाजन आणि पालकमंत्री दादा भूसे उपस्थित होते. देवेंद्र फडणवीसांनी पोलीस ठाण्याची पाहणी केल्यानंतर त्यांनी स्वतः पोलीस ठाण्यातील खुर्चीवर बसत 'मी अपेक्षा करतो हे पोलीस ठाणे जनसामान्यांना न्याय देण्याचे काम करेल, असे लिहीत पोलीस दलाला शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी भाषण करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सातपूर पोलीस स्टेशनची आधुनिक आणि सुसज्ज इमारत तयार केली आहे. इंग्रज काळात पोलीस दल शासनासाठी आज पोलीस दल नागरिकांची सेवा करण्यासाठी आहे. पोलीस ठाण्याच्या आकृतीबंधासाठी नवीन नियम, पोलीस स्टेशनही वाढवण्यात येतील. सीसीटीएनएस प्रणालीच्या माध्यमातून सर्व कामकाज ऑनलाईन झाले आहे.

## शंभरफुटी रोडवर अपघात, तीन जखमी

**धुळे ।** शहरातील शंभरफुटी रोडवरील अमन कॅफेसमोर एमएच १८ एके ३३८८ क्रमांकाची दुचाकी आणि एमएच १९ झेड ००४७ क्रमांकाचा ट्रक यांच्यात अपघात झाला. यात अब्दुल वहाब मोहम्मद हसन, सुल्ताना वसीम आक्रम, मोहम्मद हम्माद अन्सारी या तिघांना दुखापत झाली.

# पत्रकार वागळेंवर झालेल्या हल्ल्याचा धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे जाहीर निषेध

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळेंवरील हल्लयाच्या निषेधार्थ शनिवार दिनांक १० फेब्रुवारी रोजी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या नेतृत्वात पत्रसृष्टी एकवटली. वागळेंवरील भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ पत्रकारांनी एकजुटीने जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना निवेदन दिलं. या आंदोलनाला समविचारी पक्ष संघटनांच्या नेते व कार्यकर्त्यांनी उपस्थितीती देत पाठिंबा दर्शविला.

लोकशाहीचा चौथा खांब असलेल्या पत्रसृष्टीला राज्यघटनेने स्वातंत्र्य दिले आहे. जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहचविण्याचा अधिकार घटनेनेच पत्रकारांना दिला आहे. परंतु दहशत माजवून, हल्ला करुन पत्रकारांच्या अधिकारांवर घाला घालण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे शासनाने अशा हल्लेखोर आणि दहशत निर्माण करणार्या प्रवृत्तींवर कडक कारवाई करावी अशी मागणी ज्येष्ठ पत्रकार महेश घुगे यांनी जिल्हाधिकारींशी पत्रकारांसमवेत चर्चा करताना केली. निषेधार्थ धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या नेतृत्वात संपूर्ण पत्रसृष्टी एकवटली. निवेदन देतेवेळी ज्येष्ठ पत्रकार महेश घुगे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, माजी अध्यक्ष रविंद्र इंगळे, नूरखॉन पठाण, कोषाध्यक्ष तुषार बाफना, सचिव सचिन बागुल, प्रांतिक सदस्य प्रकाश शिरसाठ, सदस्य मोहन मोरे, रविंद्र नगराळे, दैनिक गरुड सम्राटचे पुरुषोत्तम गरुड, झी-२४ तासचे प्रशांत परदेशी, एबीपी माझाचे धनंजय दिक्षीत, सिध्दार्थ पारेराव, व्यंगनगरीचे संपादक राजेंद्र सोनार, सुभाष वाघ, दिव्या मराठीचे विरेंद्र मोरे, ईटीव्ही भारतचे सुनिल बैसाणे, जय महाराष्ट्रचे तुषार परदेशी, आवाज टीव्हीचे अजय गर्दे, आधुनिक केसरीचे आकाश सोनवणे, देदणकाचे दिनेश निकुंभ, आपलं नवराज्यचे चंदू पाटील, सकाळचे गोरख गर्दे, श्रमराज्यचे संजय पाटील, सिटी चॅनलचे आवेश खान, स्वतंत्र भारतचे पंकज पाटील, ए वन न्यूजचे दिपक शिंदे, दिलीप मोहिते, राम निकुंभ, खान्देश मैदानचे मनोहर सोलंकी, योगेश पाटील, राकेश गाळणकर, दिग्वीजय गाळणकर आदी उपस्थित होते. पत्रकार संघाच्या या मागणीला समविचारी संघटनांच्या पदाधिकार्यांनी पाठबळ दिले. यावेळी अंनिसचे अविनाश पाटील, शिवसेनेचे डॉ. सुशिल महाजन, किरण जोंधळे, ॲड. जगदीश सूर्यवंशी, ॲड. राहुल वाघ, काँग्रेसचे डॉ. अनिल भामरे, ॲड.संतोष जाधव, योगेश जगताप, राष्ट्रवादीचे रणजीतराजे भोसले,आझाद समाज पार्टीचे आनंद लोंढे, राजेंद्र डोमाळे, भानुदास बगदे, विनोद जगताप, मनोज जाधव, महादू गवळी, कुणाल कानकाटे, ललीत माळी, दीपक देवरे आदी उपस्थित होते.

## आरोप-प्रत्यारोप..!

मोदी सरकारने काढलेल्या श्वेतपत्रिकेला काँग्रेसने कृष्णपत्रिका काढून प्रत्युत्तर दिले आहे. निवडणुकीपूर्वी एकप्रकारे परस्परांवर झाडलल्या या आरोप प्रत्यारोपांच्या फैरीच आहेत. मोदी सरकारचा दुसरा कार्यकाळ संपत आला असतानाच आधीच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या दहा वर्षांतील अर्थव्यवस्थेवरील श्वेतपत्रिका लोकसभेत सादर करण्यात आली. त्याच वेळी काँग्रेसनेही मोदी सरकारच्या दहा वर्षांतील अन्यायाचा पाठ वाचणारी कृष्णपत्रिका सादर केली. या दोन्ही पत्रिकांमधून एकमेकांवर चिखलफेक करण्याखेरीज काहीही साध्य झाले नाही. एकीकडे श्वेतपत्रिकेतून डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात आर्थिक बेशिस्त वाढली होती अशी टीका होत असताना राज्यसभेतून निवृत्त होत असलेल्या सदस्यांना निरोप देताना पंतप्रधान मोदी मात्र मनमोहन सिंग यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करीत होते, हा विरोधाभास जाणवल्या खेरीज राहात नाही. ५८ पानांच्या या श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून यूपीए काळात देशाची अर्थव्यवस्था रसातळाला गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर या अर्थव्यवस्थेला सावरण्याचे काम झाले, असे त्यात म्हटले आहे. २००४ मध्ये यूपीए सरकार सत्तेत आले तेव्हा विकासदर ८ टक्के होता; तर महागाईवाढीचा दर केवळ ३.९ टक्के होता, तो २०१४ मध्ये ९.४ टक्क्यांवर गेला. 'यूपीए'च्या काळात भ्रष्टाचार वाढला, कोणतीही धोरण स्पष्टता नव्हती, नेतृत्वाचा अभाव होता, अशी कारणे या श्वेतपत्रिकेत नमूद करण्यात आली आहेत. टू जी स्पेक्ट्रम २चे वाटप गैरव्यवहार, कोळसा खाण वाटप गैरव्यवहार, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धातील गैरव्यवहार आदी प्रकरणे याच काळात झाली, त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला आणि प्रतिमेला धक्का बसला. ज्या प्रमाणात देशात परकीय गुंतवणूक अपेक्षित होती, त्या प्रमाणात ती झाली नाही. एकूणच यूपीएच्या कार्यकाळात देशाच्या विकासालाच ब्रेक लागला, असा आरोप या श्वेतपत्रिकेतून करण्यात आला आहे. यूपीएच्या काळातील आर्थिक बेशिस्तीवर श्वेतपत्रिकेतून टीका होत असताना मोदी सरकारच्या काळातील महागाई, बेरोजगारी आणि त्यांची आर्थिक धोरणे यावरही काँग्रेसकडून टीका होत आहे. मोदी सरकारच्या आर्थिक धोरणांचा लाभ केवळ काही मूठभर उद्योगपतींनाच होत असल्याची टीका नवी नाही. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा ताजा अहवाल आश्वासक वाटतो. या अहवालानुसार २०२२ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार २६२ लाख कोटी होता, तो २०२८ मध्ये ५०० लाख कोटीपर्यंत वाढेल अशी अपेक्षा आहे. सध्या भारत ही जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था आहे. आपल्या तिसर्या कार्यकाळात भारतही पहिल्या तीन अर्थव्यवस्थेमध्ये असेल, अशी मोदी सरकारची अपेक्षा आहे.

केंद्रातील सरकारने ही श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून आपली रेघ, त्यांच्या रेघेपेक्षा मोठी असल्याचे भासवले आहे. मात्र सर्वसामान्यांच्या बेकारी, महागाईसारख्या प्रश्नांची यातून उत्तरे मिळत नाहीत. मोदी यांनी सत्तेवर येताना दिलेली अनेक आश्वासने अपूर्ण आहेत. दोन कोटी नोकर्या देण्याचे आश्वासन पूर्ण झालेले नाही. शेतकर्यांचे उत्पन्न पाच वर्षांत दुप्पट होण्याऐवजी ते घटत आहे. शेतकर्यांच्या आत्महत्या सुरू आहेत. दरवर्षी काही लाख लोकांनादेखील नोकर्या मिळू शकल्या नाहीत, या वास्तवाकडे काँग्रेसने काढलेल्या कृष्णपत्रिकेद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांना चौकश्यांच्या फेर्यात अडकवण्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर केला जात आहे. सर्वसामान्य माणूस महागाईने त्रस्त आहे, या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करता येणार नाही. एका पाहणीनुसार बेरोजगारीची स्थिती ५३ टक्के लोकांना अतिगंभीर, १९ टक्के लोकांना गंभीर, तर १३ टक्के लोकांना साधारण वाटते. मोदी सरकारने श्वेतपत्रिका सादर करताना बेरोजगारी, महागाई या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केले आहे. केंद्र सरकारच्याच श्रम मंत्रालयाने २०१७-१८ मध्ये केलेल्या पाहणीत बेरोजगारीने ४५ वर्षांतील उच्चांक गाठल्याचे म्हटले होते, ही बाब श्वेतपत्रिकेतून दुर्लक्षित झाली आहे. या श्वेतपत्रिकेत सर्जिकल हल्ल्याचा उल्लेख आहे; पण नोटाबंदी, बेरोजगारी, चलनवाढ आणि वाढती विषमता या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केले गेले आहे.

# हल्ला काँग्रेसवर; कौतुक मनमोहन सिंगांचे



अनेक आया आपल्या बाळाला वाईट नजरेपासून वाचविण्यासाठी काळा तिट लावतात. काळा रंग हा नकारात्मक ऊर्जा शोषून घेतो. जेव्हा आई काळजीने बाळाला टिका लावते तेव्हा प्रेम, काळजी यांसह एक सकारात्मक कवच म्हणून ती त्याकडे पाहात असते. जेव्हा कुणीतरी बाळाकडे वाईट नजरेने पाहते तेव्हा हा टिका संरक्षण कवच म्हणून काम करतो असे म्हटले जाते. वाईट नजरेवर काळा रंग प्रभावी ठरतो. हे सर्व येथे सांगण्याचे प्रयोजन म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील गुरुवारी राज्यसभेत बोलताना देशाच्या प्रगतीला नजर लागू नये यासाठी काँग्रेसने काळा टिका लावल्याचा जोरदार टोला लगावला. मोदी सरकारने ज्या ज्या वेळी चांगल्या योजना, प्रकल्प आणले त्या प्रत्येक वेळी काँग्रेसने त्यांना विरोध केला. प्रसंगी कडाडून टीकाही केली आणि या योजना कशा तकलादू आहेत हे सांगण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. काँग्रेसच्या नरात्मकेवर मोदींनी हल्लाबोल केला. त्याचवेळी डॉ. मनमोहन सिंग यांचे त्यांनी कौतुकही केले.

अंतरिम अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने दिल्लीत सत्ताधारी व विरोधी पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण रंगल्याचे सतत पाहायला मिळत आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये दोन्ही गटांकडून जोरकसपणे आपली बाजू मांडली जात आहे. राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्रपतींच्या भाषणावरील आभार प्रस्तावाच्या निमित्ताने केलेल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरूंवर चौफेर हल्ला केला. त्या आनुषंगाने त्यांनी काँग्रेसला लक्ष्य करीत चहुबाजूंनी घेरले. त्याचवेळी राज्यसभेत कार्यकाळ संपलेल्या ५६ खासदारांचा निरोप समारंभ गुरुवारी पार पडला. त्यानिमित्ताने या खासदारांच्या आभार प्रदर्शनाची चर्चा सभागृहात पार पडली. या चर्चेमध्ये दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी कार्यकाळ संपणाऱ्या सदस्यांच्या बाबतीत आभारप्रदर्शन करताना आपापली भूमिका मांडली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत केलेल्या भाषणावेळी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे भरभरून कौतुक केले. मोदी म्हणाले की, जेव्हा जेव्हा लोकशाहीची चर्चा होईल, तेव्हा तेव्हा मनमोहन सिंग यांची खूप आठवण येईल. आम्हाला मनमोहन सिंग यांचे मार्गदर्शन मिळाले.

मनमोहन सिंग हे एका सजग खासदाराचे उदाहरण आहेत. खासदार अनमोल असा वारसा सोडून जातात. मनमोहन सिंग यांचे या सभागृहात विशेष योगदान आहे. खासदारांचा कधीच निरोप होत नाही. मनमोहन सिंग हे ६ वेळा राज्यसभा खासदार राहिले. वैचारिक मतभेद होते पण त्यांचे योगदान मोठे आहे. सभागृहाला त्यांनी अनेकदा मार्गदर्शन केले आहे. जेव्हा खासदारांच्या योगदानाचा उल्लेख होईल तेव्हा मनमोहन सिंग यांची चर्चा होईलच. डॉ. मनमोहन सिंग यांनी दीर्घकाळ सभागृह आणि देशाला मार्गदर्शन केले आहे. यासाठी ते कायम स्मरणात राहतील. देशासाठी त्यांचे योगदान मोठे आहे. त्या आधी पीएम मोदींनी राज्यसभेत काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला होता. आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ४० जागाही जिंकणे कठीण असल्याचा दावा त्यांनी केला होता. तसेच राष्ट्रपतींच्या भाषणावरील आभार प्रस्तावाच्या निमित्ताने केलेल्या भाषणात त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू आणि काही प्रमाणात इंदिरा गांधी यांच्यावरही टीका केली होती. पण आज राज्यसभेत मात्र वेगळेच आणि सुखावणारे चित्र पाहायला मिळाले. कारण मोदींनी ज्येष्ठ खासदार मनमोहन सिंग यांच्याबाबत गौरवोद्गार काढले. पंतप्रधान मोदींनी मनमोहन सिंग हे व्हीलचेअरवर बसून राज्यसभेत आले होते त्या प्रसंगाचाही यावेळी आवर्जुन उल्लेख केला. डॉ. मनमोहन सिंग हे व्हीलचेअरवरून मतदानासाठी आले, त्यांनी मतदान केले. लोकशाहीला ताकद देण्यासाठी ते आले होते. एक खासदार आपल्या जबाबदाऱ्यांसाठी किती जागरूक आहे याचे हे प्रेरणादायी उदाहरण होते, अशा शब्दांत मोदींनी त्यांचे मोठेपण विषद केले. विशेष म्हणजे त्यावेळी भाजपाकडून या प्रकारावर 'याद रखेगा देश, काँग्रेस की ये सनक', अशा परखड शब्दांत टीका करण्यात आली होती. काँग्रेसने आपली बेईमान आघाडी जिवंत ठेवण्यासाठी एका माजी पंतप्रधानांना रात्री उशिरापर्यंत अवघडलेल्या स्थितीत व्हीलचेअरवर बसवून ठेवले असा शब्दिक हल्ला त्यावेळी करण्यात आला होता. मात्र, मोदींनी राज्यसभेत मनमोहन सिंग यांच्या या कृतीबाबत, लोकशाहीला ताकद देण्यासाठी ते आले होते अशा शब्दांत गौरवोद्गार काढले. काँग्रेसने त्या कालखंडात आम्हाला खूप काही शिकवले. कधी कधी फॅशन परेडचे दृश्यही बघायला मिळाले. काळ्या कपड्यांमध्ये खासदारांची फॅशन परेड बघायला मिळाली. जेव्हा कोणतेही चांगले काम होते तेव्हा काळी तिट लावली जाते, अशी मिश्कील टीका त्यांनी केली. कार्यकाळ संपणारे खासदार नव्या आणि जुन्या संसद भवनाच्या आठवणी घेऊन जात आहेत.

कोरोना काळात कोणत्याही खासदाराने देशाचे काम थांबू दिले नाही. सदनात येऊन चर्चा केली आणि देशाची सेवा केली. सद्गुणी लोकांसोबत राहून आपल्यातील गुणही वाढले आहेत. नद्यांमधील पाणी जोपर्यंत वाहत राहते तोपर्यंतच ते पिण्यायोग्य राहते. पण नदी कितीही गोड असली तरी समुद्राला मिळताच ती पिण्यास अयोग्य होते, हा संदेश प्रत्येकासाठी प्रेरणादायी असेल असा खोचक टोलाही त्यांनी लगावला. लोकसभा दर पाच वर्षांनी नव्या रंगात सजते. पण राज्यसभा दर दोन वर्षांनी नव्या सदस्यांच्या येण्याने एक नवी ऊर्जा प्राप्त करते. त्यामुळे दर दोन वर्षांनी या सभागृहातून सदस्य बाहेर पडताना अनेक चांगल्या आठवणी मागे सोडून जातात. काही सदस्य सभागृह सोडून जात आहेत. असे होऊ शकते की काही लोक परत येण्यासाठी जात आहेत. तर काही लोक कायमचे जात असतील. पण आपल्या या सहकाऱ्यांचे योगदान ध्यानी घेऊन त्यांच्यावर कधी टीका केली असेल तर ते विसरून कौतुकाचा वर्षाव करणे हे जिवंत लोकशाहीचे लक्षण असल्याचे मोदींनी आपल्या कृतीने यावेळी अधोरेखित केले, असेच म्हणावे लागेल.

# वात्सल्याच्या धाग्यात बांधून ठेवणारं व्यक्तिमत्व- विजयाताई घुईखेडकर




विजयाताई घुईखेडकर यांचा जन्म हजार एकर जमिनीची मालकी असलेल्या जमीनदार शेतकऱ्याच्या घरी झाला. वयाच्या तिशीतच यवतमाळ जिल्हा भूविकास बँकेच्या चेअरमन पदी निवड झालेल्या बाळासाहेब घुईखेडकरांशीत्यांचा विवाह झाला .बाळासाहेबांकडे स्वतःची शेकडो एकर जमीन होती. पुढे बाळासाहेब आजन्म बँकेचे चेअरमन पदी राहिले. आमदार झाले, आमदारकी खासदारकी मिळवून त्यांनी बारा निवडणूका लढवल्या. सर्व लोक चळवळीत विजयाताई सावली सारख्या बाळासाहेबांबरोबर राहिल्या . सर्व नातेवाईक व सर्व जाती-धर्माच्या लोकांकरिता त्यांचे घर खुले होते . शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांची त्यांना जाण होती. त्यांनी सतत फॉलो घेऊन शेकडो लोकांना नोकरीला लावले . लोकांच्या मुलींची लग्ने लावली . त्यांना आजारपणात मदत केली शिक्षण संस्था ,बँक, आमदारकी सर्व असताना स्वतःकरता यापैकी काहीही वापरले नाही . अगदी शेवटच्या श्वासापर्यंत यांचा हात देता राहिला . सारिका व माझा विवाह २००० साली झाला .आम्ही जेव्हा जेव्हा यवतमाळ ला गेलो तेव्हा त्यांनी त्यांनी उत्सवा सारखे आमचे स्वागत केले .परतीच्या वेळेला प्रत्येक वेळी आरत्या ओवाळल्या .सर्व कुटुंब गाडीपर्यंत सोडायला यायचे. संपूर्ण कुटुंब त्यांनी वात्सल्याच्या धाग्याने बांधून ठेवले होते. त्यांना वसंत, विवेक, विनोद ,विशाल व व सर्वात लहान सारिका ही मुले. बाळासाहेब गेल्यावर सर्व मुलांचे संसार उभे राहतील याकरिता त्या झटल्या. सर्वच नातवंडांचे त्यांनी कोड कौतुक केले. मोठे वसंतराव वडिलांसारखेच कर्तबगार निघाले . त्यांनी यवतमाळ, अमरावती, नागपूर येथे शिक्षण संस्थांचे जाळे उभे केले त्यांच्या दहा वाक्यातील एक वाक्य वसंता करीता असायचे .त्यांच्या वागण्यात खानदानी ,जमीनदार, मराठ्याचा रुबाब होता व वडील, पती, मुलांच्या काळात तो टिकला. आमच्याकडे नाशिकला वर्षातून एकदा. आठ-दहा दिवस दिवसांकरिता यायच्या .आमच्या करिता विदर्भातील टिपिकल सांबर वडी वगैरे पदार्थ बनवायच्या . सारिका व नातवंडांचे खूप लाड करायच्या .भूतकाळात जास्त रमण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता .त्यांनी एकट्याने जवळजवळ सर्व भारत भ्रमण केले. तीर्थयात्रा केल्या ,पूजाअर्चा केल्या. पाच वर्षांपूर्वी त्यांच्या मुलांनी त्यांचा ७५ वा वाढदिवस साजरा केला तेव्हा त्या फारच खुशीत होत्या. गेली एक-दोन वर्ष सारख्या आजारी असायच्या. शेवटचे आजारपण सोडले तर त्यांना कोणताही आजार नव्हता. शेवटी देखील त्यांना गोळ्या औषधे घेणे आवडत नसे. त्यांच्या जाण्याने प्रेमाचा झरा आता आटला आहे. अखंड गप्पाचा स्रोत संपला आहे. सोन्याचा चमचा घेऊन जन्मल्या त्याच थाटात आयुष्यभर जगून सर्वांना मदत करता करता गेल्या. ईश्वर असले आयुष्य फारच थोड्या लोकांच्या वाट्याला देतो. ईश्वर त्यांच्या संपर्कातील सर्वांनाच समाज म्हणजेच आपले कुटुंब या त्यांच्या आयुष्यातील मुख्य धागा पुढे तसाच ठेवण्याची प्रेरणा देवो हीच प्रार्थना.



शब्द संवाद

प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

## शब्दकोडे-३१६



आडवे शब्द : १.राज ठाकरे यांचा राजकीय पक्ष ७. आजूबाजूला ९. नासाडी, खराबी १०. गोड्या पाण्यातील तांबडा मासा ११. तयार करणे १२. जोराचा हबका, शिडकावा १३. सीता, द्रौपदी यांच्या बरोबरीने पंचकन्यांमध्ये समाविष्ट असणारी रावणाची पत्नी १६. मृत्तिका १७. कागदाचे कापून ठेवलेले तुकडे १८. उणीव १९. धनुष्यबाण २२. शर्त, पण २३. बगल २५. हात २७. जन्म २८. घुबड ३०. पूर्वी पंगतीतून ऐकू येणारा ेक-'...नाव घ्या श्रीहरीचे' ३३. कैकेयीच्या दासीचे नाव ३७. मज्जाव, बंदी ३८. खालीच्या विरुद्ध ३९. कोवळा अंकुर ४०. समाजातील दरारा ४२. कबर ४६. मळजमीन, राबता ४७. दया करणारा परमेश्वर ४९. हंगाम ५१. हिम्मत, धैर्य ५३. विष ५४. च्या सह ५६. संध्याकाळ ५८. वाचकांसाठी लिहिणारा ६०. वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतलेला ६२. चक्र ६३. छोटा खिळा ६५. सुभद्रेचा नवरा ६६. छिद्र ६७. जंगल ६९. गाढव-डुकरांचे आश्रयस्थान ७०. वस्ती ७१. लहानपणी होणारा अस्थमा ७२. मोठे शहर ७३. मन, प्रसन्न असेल तरच अंगी लागते ७४. मोहरी ७५. सोनचाफा

उभे शब्द : १. गोव्यातील मगोप या राजकीय पक्षाचे विस्तृत नाव २. नाखुशीचा लग्नप्रकार ३. सृजन ४. महनीय व्यक्तीचा मृत्यू ५. सेनानायक ६. अढी खराब करणारा आंबा ७. आजूबाजूचा प्रदेश ८. श्रद्धेबरोबर महत्त्वाचा असणारा संयम १२. सम, सारखा १४. वळून तयार केला जाड धागा १५. हादरा, मार १७. सैन्य, ओरिसाची जुनी राजधानी २०. चंद्र २०अ. सोने २१. माणूस २२. देवाचे देहधारी रूप २४. गुलकंदाला गोडी आणणारी २६. च्या साठी २९. छोटा डोंगर ३१. धमकी, दीर्घ श्वास ३२. एक शेंगभाजी ३४. उंट हाकणारा ३६. अत्यंत उर्मट, उद्धट माणूस या अर्थी शब्दप्रयोग ४१. रोखलेली नजर ४३. इमारतीच्या पायात भरण्याचे दगड ४४. घर ४५. परमेश्वर ४८. धोबी ५०. आवड ५१. चुकवता अथवा बदलता न येणारे ५२. शोभणारी ५५. जास्तीत जास्त व कमीत कमी ५७. जन्म-मृत्यू ५९. रांग ६१. कोयरी ६२. तोंड फिरवल्यास 'टाळणे', कर्ज असल्यास 'फ`डणे' ६३. करवत ६४. स्त्रियांचा एक आश्चर्याचा उद्गार, '---- मन मोराचा कसा पिसारा फुलला' ६५. अकस्मात ६७. वाहून नेणे ६८. नम्र, वाकलेला ६९. पाणी

## शब्दकोडे-३१५ चे उत्तर

**● आडवे उत्तर**
१.निवडणूक ५.मतमोजणी ८.पराभव ११.कायम १२.माहितगार १३.टन १४.डबल १५.दादा १६.भुसभुशीत १९.सम २०.किसान २२.वाईट २३.नमाज २५.देह २६.सामान २७.मानस २८.महामती २९.सावधान ३१.साज ३२.पाडस ३५.नर ३६.घमघमाट ३८.धमक ३९.विणकार ४१.रन ४२.अंतर्धान ४३.महा ४४.हो ४५.वचक ४६.कद ४७.नगरसेवक ५१.लिपिक ५३.जर ५४.नारद ५५.थापेबाज ५७.मना ५८.मदनबण ६१.काक ६२.विनायक ६४.अनाथ ६५.माला ६७.चेकर ६८.कोड ६९.नगर ७०.वरकरणी ७३.हार ७५.जनक ७६.तड ७७.बत्तासा ७८.कणव

**● उभे उत्तर**
१.१.निकाल २.वय ३.डमडम ४.कमालकिमान ५.मतदान ६.तगादा ७.मोर ८.पटाशी ९.भट १०.वनराज १६.भुईसपाट १७.सट १८.तनमनधन १९.सहसा २१.सान २२.वान २४.माळ २६.साधारण २७.माजघर २८.मसलत ३०.वनविहार ३१.साम ३३.मकरंद ३४.सांड ३६.घर ३७.मानव ४०.कलेवर ४२.अंकलिपी ४३.मगर ४६.कडबा ४७.नजर ४८.सेनानायक ४९.कदम ५०.महान ५२.कथाकथन ५६.जगाला ५७.मनाचे ेक ५९.दमणूक ६०.बाप ६१.काना ६३.करवत ६४.अडकित्ता ६५.मारहाण ६६.सावज ७१.रड ७२.रस्ता ७४.रव

## चिंता नको, बिनधास्तपणे परीक्षा द्या

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे या स्वायत्त संस्थेच्या वतीने नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी आणि बारावीच्या वर्षातून दोनदा परीक्षा घेतल्या जातात. पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, लातूर, नागपूर आणि रत्नागिरी (कोकण) ही नऊ विभागीय मंडळे आहेत. फेब्रुवारी - मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावी बोर्डाच्या प्रात्यक्षिक परीक्षांचा विचार करता सध्या बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा २ फेब्रुवारीपासून सुरू झाल्या असून २० फेब्रुवारीला संपतील. त्यांनतर बारावीची २१ फेब्रुवारी ते १९ मार्च या कालावधीत लेखी परीक्षा होईल. दहावीची प्रात्यक्षिक परीक्षा शनिवार १० फेब्रुवारी सुरू होत असून त्या २९ फेब्रुवारीपर्यंत चालतील. त्यानंतर दहावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा १ ते २६ मार्च या कालावधीत असणार आहे. त्यासाठी दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करावे. म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनातील चिंता आपोआप दूर होईल. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचा संभ्रम मनात निर्माण करू नये. यासाठी वर्षभर प्रामाणिकपणे अभ्यास केला असेल, तर कोणत्याही प्रकारचे दडपण विद्यार्थ्यांच्या मनावर येणार नाही. तेव्हा हसत हसत मनमोकळेपणे बोर्डाच्या परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. या वेळच्या परीक्षेला विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी परीक्षा केंद्रांवर अर्धा तास अगोदर यावे लागणार आहे. म्हणजे वेळेच्या अगोदर अर्धा तास विद्यार्थ्यांनी येणे बंधनकारक करण्यात आले आहे. याची संबंधित विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे पेपर लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांना आराम मिळेल. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका दिली जाणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे परीक्षेच्या शेवटी दहा मिनिटे अधिक वेळ दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी वेगवेगळ्या परीक्षा केंद्रांवर जावे लागणार आहे. तशी आगावू पूर्ण माहिती विद्यार्थ्यांना परीक्षा मंडळाकडून दिली जाणार आहे. यावेळी वेगवेगळ्या शाळेतील किंवा कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी एकत्र बसविण्यात येणार आहेत. एकाच शाळेतील किंवा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी एकत्र बसविले जाणार नाहीत. जरी मागे-पुढे इतर शाळेतील अथवा महाविद्यालयातील विद्यार्थी असले तरी घाबरण्याचे मुळीच कारण नाही. कारण आपण वर्षभर अभ्यास केलेला असतो. तेव्हा प्रश्नपत्रिका हातात आल्यावर वेळेकडे लक्ष देत वेळेत प्रश्नपत्रिका सोडवावी. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये. आपली ज्या विषयाची परीक्षा असेल त्याची रंगीत तालीम वर्षभर झालेली आहे. त्यामुळे एकूण किती गुणांची प्रश्नपत्रिक आहे? प्रश्नांचे स्वरूप कसे असेल? प्रत्येक प्रश्नांला किती गुण असलीत? किती शब्दांत उत्तर लिहावे? अपेक्षित उत्तर काय लिहावे? उत्तरांची मांडणी कशी करावी याविषयी पूर्ण माहिती शिक्षक व मार्गदर्शक विषय तज्ज्ञांनी दिलेली आहे.

**क्रमश:**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# यंत्रमागधारकांना उभारी देण्यासाठी शासन सकारात्मक निर्णय घेणार : वस्त्रोद्योगमंत्री पाटील

**मालेगाव । लक्ष महाराष्ट्र**



देशात शेतीनंतर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती यंत्रमाग व्यवसायाच्या माध्यमातून होते. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील यंत्रमागधारकांना, वस्त्रोद्योग व्यवसायाला व लघुउद्योगाला उभारी देण्यासाठी समितीच्या अहवालाच्या माध्यमातून शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यात येतील. असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

आज मालेगाव येथे विविध यंत्रमाग कारखान्यास भेट व यंत्रमागधारकांच्या विविध समस्यांबाबत बैठक डायमंड लॉन्स येथे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील व पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी आमदार मौलाना मुफ्ती मोहंमद, मुंबई वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दिपक खांडेकर, नागपूर वस्त्रोद्योग आयुक्तलयाचे सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) गणेश वंडकर, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., मुंबईचे प्रशासकीय अधिकारी विजय पुजारी, वस्त्रनिर्माण निरीक्षक गजानान पात्रे, लेखाधिकारी ज्ञानेश्वर टिके, तांत्रिक सहाय्यक एस.बी. बर्मा, यंत्रमाग संघटनेचे चेअरमन साजिद अन्सारी यांच्यासह पदाधिकारी, कामगार व नागरिक उपस्थित होते.

वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, शासनस्तरावर एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२०२८ अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण योजनांचा समावेश आहे. यानुसार वस्त्राद्योग धोरणात आवश्यक असलेल्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून त्याअनुषंगान वस्त्रोद्योग विकासाला चालना देण्यासाठी यंत्रमाग व्यवसाय व त्यासंबंधित काम करणा-या कामगारांना जास्तीत जास्त सोयीसुविधा देण्यासाठी शासनस्तरावर सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले.

यावेळी यंत्रमागधारकांनी टेक्सटाईल पार्क, यंत्रमाग उद्योगांना कामगार सबसिडी, वीज व वीजमीटर समस्या, कामगारांच्या समस्या यासह सर्व वस्त्रोद्योग घटकांसंबंधी समस्या वस्त्रोद्योगमंत्री श्री. पाटील यांच्याकडे मांडली. त्याअनुषंगाने यंत्रमागधारकांनी मांडलेल्या यंत्रमाग व्यवसायासंदर्भात विविध समस्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे वस्त्रोद्योगमंत्री श्री पाटील यांनी यावेळी सांगितले. तसेच वीज सवलत मान्य करण्यात आली असून यंत्रमागधारकांना कच्चा माल योग्य दरात मिळण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरु आहेत, असेही वस्त्रोद्योगमंत्री श्री. पाटील यांनी सांगितले. वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले, नोंदणीकृत कामगारांना पेन्शन देण्याचे नियोजन आहे. तसेच आनंदाचा शिधासोबत साडीही देण्याचे नियोजन आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्ताने वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महाराष्ट्रातील मुलींना मेडीकल, इंजिनिअरींग, लॉ, पॉलीटेक्नीक ,एमबीए सहीत कोणत्याही कोर्ससाठी माहे जूनपासून फी भरावी लागणार नसल्याचे यावेळी सांगितले.

पालकमंत्री दादाजी भुसे म्हणाले की, मालेगाव हे यंत्रमागधारकांचे शहर आहे. या यंत्रमाग व्यवसायाच्या माध्यमातून कामगारांचा उदरनिर्वाह होतो. त्याअनुषंगाने यंत्रमागधारकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील हे मालेगाव शहरात आले त्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच यंत्रमागधारकांच्या समस्या जाणून घेतल्या असून समितीच्या माध्यमातून अहवाल आठवडयाभरात शासनास सादर करण्यात येणार असल्याचे यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

आमदार मौलाना मुफ्ती मोहंमद म्हणाले, शासनाने यंत्रमागधारकांच्या हितासाठी समितीच्या माध्यमातून समस्या सोडविण्यासाठी शासन सकारात्मक आहे. तसेच यंत्रमागधारकांच्या समस्या प्रत्यक्ष येवून जाणून घेतल्या याबद्दल वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील व पालकमंत्री दादाजी भुसे यांचे आभार मानले.

# 'निर्भय बनो' वरील जीवघेण्या हल्ल्याचा अंनिसतर्फे जाहीर निषेध



**निषेधाचे पत्र जिल्हाधिकारी नाशिक यांना सादर**

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र**

शुक्रवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी पुणे येथे, 'निर्भय बनो' या लोक चळवळीच्या माध्यमातून जनसामान्यांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी, सनदशीर मार्गाने लोकांना प्रबोधित करण्यासाठी राष्ट्रसेवा दल कार्यालय, सिंहगड रोड, पुणे येथे आलेले ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे, एडवोकेट असीम सरोदे, विचारवंत व पर्यावरण तज्ञ डॉ. विश्वंभर चौधरी आणि इतर मान्यवर तसेच काही महिला कार्यकर्त्यांवर काही राजकीय पक्षाच्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी पोलिसांसमोर जीवघेणा हल्ला केला. त्यांना धक्काबुक्की करून त्यांच्या वाहनाची तोडफोड केली. काही महिला कार्यकर्त्यांवर दगडफेक करून त्यांना जखमी केले. ही घटना केवळ पत्रकार, वक्ते, विचारवंत, कलावंत, कार्यकर्ते यांच्यावर हल्ला नसून तो भारतीय लोकशाहीवरचा हल्ला आहे. असे अंनिसचे म्हणणे आहे.

निर्भय बनो कार्यक्रमातील वक्ते आणि कार्यकर्ते यांच्यावरील जीवघेण्या हल्ल्याबद्दल महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व सर्व पुरोगामी, परिवर्तनवादी समविचारी कार्यकर्ते, नागरिक यांच्यावतीने या घटनेचा तीव्र शब्दात जाहीर निषेध करण्यात आला. तसे पत्र महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नाशिक जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी, नाशिक यांना देण्यात आले. निषेधाच्या पत्रात पुढे म्हटले आहे की, ज्या सनातनी, धर्मांध शक्तींनी ही हिंसक घटना जाणिवपूर्वक घडवून आणली, त्यांना पोलिसांनी तातडीने ताब्यात घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी. अलिकडच्या काही दिवसांपासून छत्रपती, फुले, शाहू, आंबेडकर या महापुरुषांच्या महाराष्ट्रात दिवसाढवळ्या हिंसक घटनांच्या प्रमाणात वाढ होत चाललेली आहे. परिणामी महाराष्ट्रातील जनजीवन अतिशय भेदरलेल्या अवस्थेत दिवस कंठीत आहे. सर्वसामान्य माणूस मनातून अतिशय सैरभैर झाला असल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक जीवनामध्ये आज प्रचंड अस्थिरता, अगतिकता, असुरक्षितता निर्माण झाली आहे. राज्यकर्त्यांनी समाजाच्या या गंभीर समस्यांवर लक्ष केंद्रित करून जनसामान्यांच्या दररोजच्या जगण्याला दिलासा, आधार देणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र याऐवजी जर गुंडगिरीला प्रोत्साहन मिळत असेल, ती फोफावत असेल आणि ती खपून घेतली जात असेल तर श्रयापुढील काळात भारत देशाची लोकशाही वाचविण्यासाठी सर्व पुरोगामी आणि विवेकवादी विचारसरणीच्या व्यक्ती आणि समूह मोठ्या प्रमाणात सनदशीर मार्गाने रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना आणि राज्यकर्त्यांना हा निर्वाणीचा इशारा देण्यात येत असल्याचे पत्रात म्हटले आहे. या पत्रावर अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, राज्य कार्यवाह प्रा. डॉ .सुदेश घोडेराव, राज्य सदस्य राजेंद्र फेगडे, प्रल्हाद मिस्त्री, जिल्हा प्रधान सचिव नितीन बागुल, शहर कार्याध्यक्षा प्रा. आशा लांडगे, विजया गोराणे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्व.सदाशिव गंगाराम भोरे कलामंदिरचे झाले लोकार्पण

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र**



नाशिक महानगरपालिकेतर्फे २५ कोटी रूपये निधी खर्चून हिरावाडी येथे साकारलेल्या स्व.सदाशिव गंगाराव भोरे कलामंदिराचे लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास व पर्यटन मंत्री गिरीश महाजन, आमदार राहुल ढिकले, सीमा हिरे, देवयानी फरांदे, महानगरपालिका आयुक्त अशोक करंजकर, माजी आमदार बाळासाहेब सानप, माजी नगरसेविका प्रियंका माने, पूनम मोगरे, रूची कुंभारकर, मच्छिंद्र सानप यांच्यासह अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फित कापून व कोनशिला अनावरण करून कलामंदिराचे लोकार्पण करण्यात आले. हिरावाडी परिसरात महापालिकेच्या सहा एकर जागेत या कलामंदिराचे २९०० चौरस मीटरचे बांधकाम करण्यात आले आहे. या नाट्यगृहात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नाट्यगृहाच्या पश्चिम बाजूस वाहनतळाची प्रशस्त व्यवस्था करण्यात आली आहे. दोन्ही बाजूंना प्रसाधनगृहांची व्यवस्था, कलाकारांना तालीम करण्यासाठी दोन्ही मजल्यांवर स्वतंत्र दोन हॉल, भव्य रंगमंच व सुसज्ज मेकअप रूमही आहे. नाट्यगृहात भव्य प्रकाशयोजना, ध्वनीयोजना, स्वयंचलित सरकते पडदे यासह बाल्कनीत १५० आणि खाली ५०० अशा एकूण ६५० आरामदायी खुर्च्यांची आसनव्यवस्था करण्यात आली आहे. यासह अत्याधुनिक सीसीटिव्ही यंत्रणा व सुरक्षिततेच्या दृष्टीन अग्नीशमन यंत्रणाही येथे कार्यान्वित करण्यात आली आहे.

# मनसे शहर उपाध्यक्षावर एक लाखाच्या खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल

**नाशिक ।** सिडकोतील प्रभाग क्रमांक २४ मधील सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे काम करणाऱ्या कामगारांना एक लाख रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी मनसे शहर उपाध्यक्षावर खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी राजेंद्र गोरडे यांनी फिर्यादी दिली की, सिडकोतील प्रभाग क्रमांक २४ मध्ये हनुमान चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे काम चालू असताना आदेश खांडरे, प्रतीक साळुंखे, यश निकम, चेतन शेलार, अक्षय खांडरे यांनी कामगारांना दमदाटी केली. पुन्हा काम सुरू करायचे असेल तर एक लाख रुपये देण्याची मागणी केली. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात पाचही जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संस्कृत भाषेच्या संवर्धनासाठी नाशकात होणार संस्कृत विद्यापीठ

**खा. हेमंत गोडसे यांची माहिती**

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र**

संस्कृत भाषेचे जतन व्हावे, भाषा जनसामान्यांपर्यत पोहचावी यासाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडून सुरू असलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. मुंबईत पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्याने नाशिक शहरात संस्कृत विद्यापीठाचे केंद्र उभारणीचा निर्णय केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय विभागाने घेतला आहे. केंद्राच्या उभारण्यासाठी पुरेसी आणि विस्तीर्ण जागा उपलब्ध करून देण्याविषयीचे पत्र विद्यापीठ प्रशासनाने जिल्हा प्रशासनाला पाठविले आहे. जागा उपलब्ध झाल्यावर विद्यापीठ कॅम्पसमध्ये पायाभूत सुविधांसाठी केंद्र शासनाकडून पहिल्या टप्प्यातच तीनशे कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याची माहिती खा. गोडसे यांनी दिली आहे.

संस्कृत भाषेला देशात आणि देशाबाहेरही अनन्यसाधारण महत्त्व आहे. असे असले तरी गेल्या अनेक वर्षांपासून संस्कृत भाषा जतन करण्यासाठी हवे तसे प्रयत्न होत नसल्याने आजमितीस संस्कृत भाषा अडगळीला पडल्याची चित्र समोर येत आहे. यातूनच संस्कृत भाषेचे जतन व्हावे यासाठी खा. गोडसे यांच्याकडून गेल्या काही महिन्यांपासून दिल्लीस्थित केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय प्रशासनाकडे प्रयत्न सुरू होते.

खा. गोडसे यांच्याकडून सुरू असलेल्या सततच्या प्रयत्नांना यश आले आहे. केंद्रीय संस्कृत महाविद्यालय प्रशासनाने नाशिक येथे विद्यापीठाचे केंद्र उभारणीचा निर्णय घेतला आहे. यासाठी योग्य आणि विस्तीर्ण जागा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने जिल्हा प्रशासनाला पत्र पाठविले आहे. यातूनच प्रशासनाने शिलापूर शिवारातील सुमारे चाळीस एकर जागेची पाहणीही केलेली आहे. संस्कृत भाषेचे जतन व्हावे, भाषा समृद्ध व्हावी तसेच भाषेचे संवर्धन व्हावे हा विद्यापीठ उभारणी मागचा मुख्य उद्देश आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून पारंपारिक भारतीय ज्ञान प्रणालींना प्रोत्साहन देण्यात येणार असून शैक्षणिक उत्कृष्टतेला चालना मिळणार असल्याची माहिती खा. हेमंत गोडसे यांनी दिली आहे.

# कौशल्य बेरोजगारांसाठी वरदान : साधना खैरनार



**धुळे । लक्ष महाराष्ट्र**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालय मोराणे ग्रामीण अध्ययन शिबिराचा दुसरा दिवस. या दुसऱ्या दिवसाच्या बौद्धिक सत्रामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना श्रीमती साधना खैरनार यांनी उपस्थित तरुणांना जीवन कौशल्य काय आहेत याचे महत्त्व आधोरेखीत केले.

विविध प्रकारचे कौशलच बेरोजगारीवर रामबाण उपाय आहे नव्हे तर कौशल्यच बेरोजगारीसाठी वरदान ठरतात अशी आग्रही भूमिका मांडली. पुढे बोलताना त्यांनी बेरोजगारीची विविध कारणे व बेरोजगारी संदर्भात दृश्य परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तरुणांनी तारुण्यवस्थेत मेहनत व चिकाटी केली तर आयुष्यभर दिमाखदार जीवन जगता येते अशी ही आग्रही भूमिका मांडली. बौद्धिक सत्राचे अध्यक्ष प्रा. श्याम वाळवी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विविध कौशल्य आत्मसात केले पाहिजे आणि कौशल्य जीवनाला तारणार आहेत. ज्यामधून बेरोजगारीचा प्रश्न सुटू शकतो असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुनम जगताप यांनी केले तर आभार माधुरी गायकवाड यांनी मानले.

# नाशिक येथील मुंबई नाक्यावर ५ सिग्नल बसविणार

**नाशिक ।** द्वारका चौकात सहा बाजूने वर्दळ असल्याने तेथे असलेल्या सिग्नलच्या धरतीवर मुंबई नाका येथे सिग्नल बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एकूण पाच सिग्नल मुंबई नाका येथे बसविले जाणार आहे. द्वारका चौकात शहरातील सहा ठिकाणाहून वाहतुकीचे वर्दळ होते. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक ठप्प होत असल्याने या भागात सर्व्हिस रोडसह राष्ट्रीय महामार्गावरदेखील सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली आहे. एका सिग्नलचा कालावधी जवळपास दोन मिनिटे असल्याने वाहनधारकांना सिग्नलवरून गाडी बाहेर काढताना विलंब होत असला तरी वाहतुकीचे नियोजन मात्र व्यवस्थित होत आहे. त्यामुळे मुंबई नाक्यावरदेखील द्वारका सिग्नलप्रमाणेच यंत्रणा बसवली जाणार आहे. त्यासाठी १८ लाख रुपये खर्च केले जाणार आहे.

**ॲड.संदीप अर्जुन गर्दे**
**नि.६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि.कि. अर्जक्र. १९२/२०२४**

१. मिराबाई गबाजी गवळी,वगैरे ....**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**निरंक** ...**जाबदेणार**

कै. गबाजी (गबा) भिका गवळी
खेडे ता.जि. धुळे ....**मयत**

ज्या अर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. सो.धुळे यांचेकडे दि.२९/१/२०२४ रोजी अर्जदार यांनी कि. दि.अर्ज क्र १९२/२०२४ चा अर्ज कै. गबाजी (गबा) भिका गवळी यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.१३/०३/२०२४ हि निश्चित केली आहे. त्या अर्थी तमामजनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कोर्टनं. ७ सो,धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदववी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण: धुळे
दि.१०/२/२०२४ आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे**

**ॲड. अतुल अरूण जगताप, धुळे**
**नि.६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. ६ वे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. २३६ / २०२४**

श्रीमती. माधुरी मधुसूधन उपासनी वै.३ ....**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

कै. मधुसूधन भानुदास उपासनी (मयत) ....**जाबदेणार**

ज्याअर्थी की, कै. मधुसूधन भानुदास उपासनी हे अर्जदार नं. १ श्रीमती. माधुरी मधुसूधन उपासनी यांची पत्नी आहे तर अर्जदार नं. २. श्री. मिलिंद मधुसूधन उपासनी यांचे पिता आहे तसेच ३. श्रुतिका नगरकर (विवाह आगोदरचे नाव- श्रुतिका मधुसूधन उपासनी) याचे पिता आहे. कै. मधुसूधन भानुदास उपासनी यांचे दि.२५/०४/२०२३ रोजी मौजे धुळे ता. जि. धुळे येथे निधन झालेले आहे, अर्जदार यांना शासकीय व निमशायकीय विविध कार्यालयातील कामांन करिता वारस तक्त्याची/दाखल्याची अर्जदार नं. १ ते ३ यांना नितांत तातडीची गरज आहे त्यामुळे अर्जदार नं. १ व ३ यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. १९/०३/२०२४ रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक - ८/२/२०२४ आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

**ॲड.एन. पी. मोरे**
**नि.६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मा.सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे न्यायालयात**

**कि. दि. अर्ज क्रं. २३१/२०२४**

स्वाती गितेश ठाकरे वगैरे ३ ....**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** ...**सा.वाला**

कै. गितेश साहेबराव ठाकरे मृत्यु दिनांक :- ०१/०१/२०२४
मृत्यु ठिकाण :- धुळे ता. जि. धुळे ....**मयत**

वारस दाखला मिळणेसाठी

सदरचा अर्ज अर्जदार नं. १ ते ४ कै. गितेश साहेबराव ठाकरे यांचे कायदेशीर वारस म्हणुन वारस दाखला मिळण्यासाठी या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद अर्जाचेकामी दि. १४/३/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मे. कोर्टात व्यक्तीशः व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे / हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ७/०२/२०२४ आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय व.स्तर,धुळे**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय व.स्तर,धुळे**

**ॲड.प्रविण डी. चौधरी, धुळे**
**नि.६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. २४२/२०२४**

१. श्रीमती वैशाली विजय पाटील उ.व.-४२ वर्ष, धंदा-घरकाम
२. विशाल विजय पाटील उ.व.-२४ वर्ष, धंदा शिक्षण
३. चेतन विजय पाटील उ.व.-२१ वर्ष, धंदा-शिक्षण
सर्व रा. कापडणे, ता. जि. धुळे. ....**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

**आणि**

कै. विजय रामदास पाटील (मयत) मयत दि. ०४/०४/२०२२,
मृत्यु ठिकाण : कापडणे, ता. जि धुळे ....**मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. विजय रामदास पाटील (मयत) यांचे अर्जदार ही कायदेशीर वारस असुन वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय कामासाठी तसेच इतर खाजगी कामाकरीता तसेच वेळोवेळी आवश्यक त्या ठिकाणी वारस दाखला आवश्यक असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि.६/२/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.२२/०३/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. २, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ८/२/२०२४ आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय सो. व.स्तर,धुळे**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय सो. व.स्तर,धुळे**

**ॲड. सागर एस. जैन, धुळे**
**नि.६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज क्र.२३५/२०२४**

श्री. वसंत रामा गवळी वगैरे १ ....**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

कै. रामा वाघोजी घुगरे (गवळी) (मयत) ....**जाबदेणार**

मुंबई रेग्युलेशन १८२७ ॲक्ट (भाग तखखख) प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज.

या जाहिर नोटीसीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मयताचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार क्रं. १ व २ यांनी सदरचा अर्ज केला आहे. मयत कै. रामा वाघोजी घुगरे (गवळी) हे मौजे चितोड, ता.जि. धुळे येथे दि. १०/०९/२०२३ रोजी मयत झाले आहेत त्यांचे वारसांनी कायदेशीर वारस म्हणून धुळे मे. दिवाणी न्यायाधीश साो. क. स्तर यांचे कोर्टात वारस दाखला मिळणेसाठी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ भाग तखखख प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी दि. १६/०३/२०२४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर वारस दाखला बाबत कोणाचीही हरकत/म्हणणे असल्यास अगर अधिकार असल्यास त्यांनी चौकशीच्या दिवशी सकाळी ११.०० वाजता स्वतः अथवा वकिलामार्फत धुळे मे. ५ वे सह दिवाणी न्यायाधीश सा. क. स्तर यांचे कोर्टात हजर होवून लेखी हरकत घ्यावी.

सदर दिवशी चौकशीचे कामी कोणाचीही काहीही हरकत न आल्यास चौकशीचे कामकाज पुर्ण होवून अर्जाचा निकाल दिला जाईल. कळावे,

आज दि. ८/२/२०२४ रोजी आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

धुळ
दि. ८/२/२०२४ आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **मे.दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर, धुळे**
**सहा.अधिक्षक** — **मे.दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर, धुळे**

# मालमत्ता कर वसुलीसाठी पालिका पथकाची नियुक्ती

### मार्च महीन्यात केवळ वसुलीचे उदिष्ट

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त




### वसुलीसह कारवाई

**मालमत्ता कर २० हजारांवर व दहा हजारांवर पाणीपट्टी ज्यांच्याकडे बाकी आहे अशा थकबाकीदारांकडे भेटी देऊन थकबाकी वसूल करणे किंवा जप्ती कारवाई करण्याचे आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी दिले आहेत. तसेच नियंत्रण अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जप्ती करणे, नळजोडणी खंडित करण्याची कारवाई करण्याचे आदेशात म्हटले आहे.**

### अधिकाऱ्यांची नियुक्ती

**सहाय्यक नियंत्रण अधिकारी म्हणून करमूल्य निर्धारण अधिकारी पल्लवी शिरसाट, उपायुक्त डॉ. संगीता नांदूरकर, उपायुक्त शोभा बाविस्कर, उपायुक्त हेमंत निकम, मुख्य लेखाधिकारी गजानन पाटील, अभियंता कैलास शिंदे, कार्यकारी अभियंता नवनीत सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वसुली जप्ती पथकप्रमुख म्हणून कनिष्ठ अभियंता हेमंत पावटे, सहाय्यक अभियंता पी. डी. चव्हाण, सहाय्यक अभियंता सी. एम. उगले, कनिष्ठ अभियंता एन. के. बागूल, कनिष्ठ अभियंता कमलेश सोनवणे, मानधन कनिष्ठ अभियंता निखिल टकले, कनिष्ठ अभियंता प्रकाश सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

मालमत्ता करापोटी चालू मागणीसह तब्बल ७३ कोटी रुपये थकबाकी वसुलीसाठी महापालिका प्रशासनाने अखेर महापालिकेची मोठी यंत्रणा कामाला लावली आहे. नियंत्रण अधिकारी, सहाय्यक नियंत्रण अधिकारी, वसुली/जप्ती पथकप्रमुख व कर्मचारी, मालमत्ता निरीक्षक, मालमत्ता कर लिपिक, मदतनीस, फीटर अशा सुमारे दीडशे कर्मचाऱ्यांची फौज करवसुलीसह जप्ती कारवाईसाठी नियुक्त करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी महापालिकेची मोठी यंत्रणा मराठा समाज सर्वेक्षणाच्या कामासाठी नियुक्त होती. त्यामुळे करवसुलीला ब्रेक लागला होता.

त्यानंतर 'रन फॉर धुळे' अर्थात धुळे मॅरेथॉन-२०२४ साठीही अधिकारी, कर्मचारी कामाला होते. त्यामुळेही करवसुलीचे काम थंडावले. दरम्यान, महापालिकेच्या तिजोरीत असलेला खडखडाट व मोठ्या प्रमाणावर असलेली मालमत्ता कर थकबाकी तसेच मार्चअखेर या पार्श्र्वभूमीवर महापालिका प्रशासनाने करवसुलीसाठी कंबर कसली आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी अधिकाऱ्यांच्या बैठकीत करवसुलीसाठी सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कामाला लागावे, रन फॉर धुळे संपल्यानंतर आता रन फॉर वसुली सुरू करा, असे सांगितले होते. त्यानुसार मार्च-२०२४ अखेर जास्तीत जास्त करवसुली व्हावी यासाठी मालमत्ता कर विभागासह इतर विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांना या कामासाठी नियुक्त करण्यात आले आहे. अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या नियंत्रणात सात पथके नेमण्यात आली आहेत. या पथकात सहाय्यक नियंत्रण अधिकारी, वसुली तथा जप्ती पथकप्रमुख, वसुली तथा जप्ती पथकातील कर्मचारी, मालमत्ता निरीक्षक, मालमत्ता कर लिपिक, मदतनीस, फीटर आदी कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे.



# घरफोडीच्या उद्देशाने फिरणारे ताब्यात; ९ लाखाचा मुद्देमाल हस्तगत

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

घरफोडी करण्याच्या उद्देशाने फिरत असलेल्या चौघांच्या वाहनासह पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून गावठी कट्टा व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. मात्र यातील दोघे फरार झाले असून फरार आरोपींचा शिरपूर तालुका पोलीस शोध घेत असून, पुढील तपास शिरपूर पोलिसांतर्फे करण्यात येत आहे.

शिरपूर तालुक्यातील पळासनेर घाटात काही संशयीत ईसम वाहनात फिरत असल्याची गोपनिय माहिती बातमीदारामार्फत शिरपुर तालुका पोलीसांना मिळाली होती. या माहितीवरून पोलीस मुंबई-आग्रा माहामार्गावर पळासनेर घाटात पोहोचले. येथे पळासनेर शिवारातील भिलाट बाबा मंदिराच्या पुढे नाल्याजवळ संबंधित वाहन पोलिसांना मिळुन आले. पोलिसांनी या वाहनांची तपासणी केली.

वाहनात सहा ईसम पोलिसांना आढळून आले. परंतु त्यातील दोघे इसम पसार होण्यात यशस्वी झाले असून, चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या चौघांकडून पोलिसांनी दोन गावठी बनावटीचे पिस्तूल, त्याचबरोबर तीन जिवंत कार्तूस, चाकू तसेच मिरचीची पूड असे घरपोडीसाठी आवश्यक असलेले साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे. त्या कारवाईत जवळपास नऊ लाखांपेक्षा अधिकचा मुद्देमाल पोलिसांनी या चोरट्यांकडून जप्त केला आहे.

## न्यूज कॉलम

### एकाला मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**शिंदखेडा ।** न्यायालयात केस चालू आहे, त्यामुळे घरी येण्याचे कारण नाही, असे सांगितल्याचा राग आल्याने चौघांनी एकास मारहाण केली. जोगशेलू (ता. शिंदखेडा) शिवारातील विखरण रस्त्यावर घटना घडली. सतिलाल भाईदास देसले (रा. जोगशेलू) यांच्या फिर्यादीनुसार त्यांची व त्यांच्या पत्नीची न्यायालयात केस चालू आहे. या दरम्यान पत्नी घरी लग्नाचा घागरा घेण्यासाठी येत असताना त्यासंबंधी बोलल्याचा राग आल्याने सतिलाल देसले यांना मोहिनी पाटील, भगवान हिंमत पाटील, प्रमिला भगवान देसले व गणेश भगवान देसले यांनी शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी, सळईने मारहाण करून जखमी केले.

### भाजपा व्यापारी आघाडीतर्फे व्याख्यान

**धुळे।** भाजपा व्यापारी आघाडी, धुळे तर्फे ४५ दिवसात पेमेंटच्या कायदा याविषयावर रविवारी सकाळी साडेनऊ वाजता खोलगल्लीत हॉटेल स्पाइस स्ट्रीट क्रिस्टल हॉलमध्ये जी. बी. मोदी यांचे व्याख्यान आयोजित केले.

### बेपत्ता महिलेसह मुलांचे मृतदेह आढळले शेततळ्यात

**शिरपूर ।** निफाड तालुक्यातील शिवापूर (शेळकेवाडी) येथून सोमवार (ता. ५)पासून घरातून निघून गेलेल्या विवाहित महिला व तिच्या दोन्ही मुलांचे मृतदेह शेततळ्यात सापडले असून, या प्रकरणी मृत विवाहितेच्या भावाने दिलेल्या माहितीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद झाली आहे. या तिघांचे मृतदेह शिवापूर शेळकेवाडी येथे त्यांच्याच मालकीच्या शेततळ्यात आढळून आली. याबाबत पोलिस निरीक्षक भास्करराव शिंदे, उपनिरीक्षक प्रवीण उद्ये तातडीने शेळकेवाडी येथे दाखल झाले व त्यांनी मृतदेहांचा पंचनामा केला.

# खा. गोडसे यांनी आपल्या कुटुंबासह पंतप्रधान मोदी यांची घेतली सदिच्छा भेट

नाशिक । प्रतिनिधी

खा. हेमंत गोडसे यांनी काल आपल्या कुटुंबासह दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी खा. गोडसे यांनी जिल्ह्याच्या विकासाविषयी अंतिम मान्यतेसाठी केंद्राकडे प्रलंबित असलेल्या विविध प्रकल्पांच्या प्रस्तावाविषयी पंतप्रधानांशी चर्चा केली.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी खा.गोडसे यांची नात शरण्याला टेबलावर उभे करत 'पंतप्रधान बडा क्या,



शरण्या बडी: असा लाडिक सवाल करून शरण्याला बोलते करण्याचा प्रयत्न केला. यावेळी खा. गोडसे यांच्या कुंटूबियातील अनिता गोडसे, संजय करंजकर, सुजाता करंजकर आदी उपस्थित होते.

# माजी नगराध्यक्ष रावसाहेब प्रभाकरराव चव्हाण यांचे दु:खद निधन

शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त



महाराष्ट्र शिरपूर वरवाडे नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष रावसाहेब प्रभाकरराव तुकाराम चव्हाण यांचे वयाच्या ७० व्या वर्षी १० फेब्रुवारी २०२४ शनिवार रोजी सकाळी ७ वाजता शहरातील माळी गल्ली येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सायंकाळी ५ वाजता राहत्या घरापासून काढण्यात येऊन शहरातील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्र्चात पत्नी, भाऊ, दोन मुली, जावई, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. रावसाहेब प्रभाकरराव चव्हाण हे आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या परिवारातील विश्र्वासू सहकारी व कौटुंबिक सदस्य म्हणून सर्वदूर परिचित होते. त्यांनी १९८५ पासून गेल्या ४० वर्षांपासून शिरपूर वरवाडे नगरपरिषदेत नगरसेवक म्हणून उत्तम कामगिरी बजावली. २००० पासून धुळे व नंदुरबार जिल्हा सहकारी बँकेवर संचालक म्हणून कार्यरत होते. महात्मा ज्योतिबा फुले विधायक मंडळ संस्थापक अध्यक्ष, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव, आर. सी. पटेल एज्युकेशन ट्रस्ट सचिव, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे व्हाईस चेअरमन, भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकरिणी विशेष निमंत्रित सदस्य, भारतीय जनता पार्टी शिरपूर तालुका प्रभारी यासह असंख्य पदांवर ते विराजमान होते.

# सुभाष कॉलनी येथे आर.सी.पटेल मराठी प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन 'महिला सशक्तीकरण' उत्साहात साजरा

शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शहरातील सुभाष कॉलनी येथील आर.सी.पटेल प्राथमिक शाळेत महिला सशक्तीकरण या थीमवर वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यात विद्यार्थ्यांनी महिला सशक्तीकरणावर आधारित नृत्य, नाट्य द्वारे आजच्या काळातील महिलांचे विविध क्षेत्रातील असणारे योगदान व त्यांनी केलेल्या प्रगती विषयीची माहिती सादर केली.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा संगीताताई देवरे तर प्रमुख अतिथी म्हणून माजी नगरसेविका आशाताई बागुल, माजी पंचायत समिती सदस्य छगन पाटील, बालाजी सेवा समिती सदस्या सरोज चावडा, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजय माळी, सीए अनुप शिंपी, लायनेस क्लबच्या माजी अध्यक्षा कविता बाविस्कर, तोरखेडा सरपंच मनीष गरुड उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते सरस्वती व सावित्रीबाई फुले, जिजामाता यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापक गोपाल पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक सादर केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रत्येक वर्गातील एक आदर्श विद्यार्थ्याचा ट्रॉफी देऊन गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमात नर्सरी ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यात इशस्तवन, वेलकम साँग, हिरकणी, हवा हवाई, हल्ला बोल, मै निकला, तूने ओ रंगीला, कोई मिल गया, ओ री चिया, जिजाऊ, झांसी की राणी तसेच नाटिका आनंदीबाई जोशी व नारी शक्ती सन्मान असे एकूण १४ कलाकृतींचा समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. सूत्रसंचालन स्नेहल शिंदे, दीपिका पाटील, ऋतुजा पाटील व संदीप तांबट यांनी केले तर आभार महेंद्र माळी यांनी मानले. सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी संयोजन केले.

# जत्रा-यात्रांमधील उघड्यावरील पशूबळी विरोधातील कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी : अंनिस

### नाशिक जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील वडांगळी, दोडी बुद्रुक तसेच जिल्ह्यातील इतर काही तालुक्यांतील गावांमध्ये असलेल्या दैवतांच्या किमान दहा ठिकाणी

जत्रा-यात्रांमधून नवसपूर्ती व परंपरेचा आणि धर्माचा भाग म्हणून मोठ्या प्रमाणात पशूपक्षी बळी देण्याची अनिष्ट, अघोरी प्रथा आजही पाळली आणि जोपासली जात आहे. ही प्रथा बंद करावी अशी मागणी अंनिस ने नाशिक जिल्हाधिकारी यांना दिलेल्या मागण्यांच्या निवेदनात केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नवसपूर्तीचाच भाग म्हणून सार्वजनिक रस्त्यावरून लोटांगण, दंडवत घालणे, लोखंडी हूक पाठीच्या त्वचेला टोचून, गळ खेळणे असे अघोरी आणि अमानुष प्रकारही घडताना दिसतात. असे प्रकार करण्यात



महिलांची संख्या मोठी असते. स्त्री जीवनाला अशी प्रथा कलंक आहे. शिवाय जत्रा-यात्रांमधून अपघात, चोऱ्या, अनारोग्य, व्यसनांना मोकळीक, वाहतुकीची समस्या अशा अनेक सामाजिक समस्या, गैरप्रकार अचानक गंभीर रूप धारण करतात. हे सर्व थांबवण्यासाठी आणि उघड्यावरील पशुबळीच्या विरोधात असलेल्या कायद्याची कडक अंमलबजावणी होण्यासाठी महाराष्ट्र अंनिसच्या वतीने जिल्हाधिकारी, नाशिक यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, जत्रायात्रांमधील हे अनिष्ट, अघोरी , अमानुष प्रकार थांबवण्यासाठी महाराष्ट्र अंनिस गेल्या २७ वर्षांपासून प्रबोधन-सत्याग्रह - संघर्ष या मार्गाने प्रयत्न करीत आहे. नवसापोटी पशूपक्षी बळी देऊ नयेत. ते संत - समाज सुधारकांच्या विचारांशी विसंगत आहे. अशा अनिष्ट, अघोरी प्रकारांतून व्यक्ती, कुटुंब, समाज यांच्या आर्थिक शोषणासोबतच ते दैववादी बनत जातात. मानसिक गुलामीत अडकत जातात. संघटनेच्या प्रबोधनपर प्रयत्नांतून काही अंशी या अनिष्ट प्रथा थांबविण्यात संघटनेला यश मिळालेले आहे.मात्र वारंवार सांगूनही त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होताना दिसत नाही. शिवाय, 'नवसापोटी पशूपक्षी बळीला प्रतिबंध' असा ठराव संबंधित ग्रामपंचायतींनी करून तो प्रसिद्धीस द्यावा आणि जत्रास्थळी तसेच गावामध्येही तो कायमस्वरूपी लावावा, असे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित करून, संबंधितांना तातडीने पाठवावेत,अशी विनंती निवेदनात करण्यात आलेली आहे.

# विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समितीची महावितरण कार्यालयासमोर द्वारसभा

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

महानिर्मिती, महवितरण आणि महापारेषण या तीनही कंपनीतील सर्व वीज कंत्राटी कामगारांना आज रोजी मिळत असलेल्या एकूण पगारात दि. १ एप्रिल २०२३ पासून मागील सर्व फरकासह ३० टक्के वेतनवाढ करून देण्यात यावी यासह अन्य १७ मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती २०२४ चॅट वतीनं करण्यात येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील आंदोलनांतर्गत शुक्रवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी धुईल शहरातील वीजवितरण कंपनीच्या कार्यालयासमोर द्वार सभा घेण्यात आली. प्रसिद्धी पत्रकावर संघटनेचे नचिकेत मोरे, निलेश खरात, वामन बुटले, भाई चैनदास भालाधरे, डी जी तायडे, शंकर गडाख, सुरेश भगत, विक्की कावळे, सतीश तायडे, दीपक ओतारी, संजय पडोळे, वामन मराठे, नीताई घोष, रमेश गणोरकर, आदी पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

# श्री सप्तश्रृंगी पतसंस्थेच्या चेअरमन पदी डॉ.टाटीया तर व्हायचेअरमनपदी सुभाष जगताप यांची निवड

**पिंपळनेर ।** येथील श्री सप्तशृंगी नागरी सहकारी पतसंस्थेच्या यशस्वी २४ व्या वर्षी निवडणूक बिनविरोध झाली असून चेअरमन पदी डॉ टाटीया तर व्हाय चेअरमन पदी जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप यांची बिनविरोध निवड झाली असून संचालक पदी श्रीराम चौधरी,प्रा डी टी पाटील,श्री शिवदास चौरे,श्री राजेंद्र मुसळे, दिलीप कोठावदे,विजय सोनार,श्री अभिजित रासीनकर ,सौ विजयबाई कोठावदे,सौ रजनी व सौ वैशाली कोठावदे,पल्लवी महाजन,सौ वर्षा कोठावदे,सौ दिपाली कोठावदे,सचिव शाम कोठावदे,यांचा कर्मचारी वृंद बिजू टाटिया,हरीश जगताप संजय कोठावदे यांनी अभिनंदन केले.

# धुळे शहरातील सुंदरच कॉलनीत महिलांच्या उत्साहात पार पडला हळदी कुंकवाचा कार्यक्रम

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धुळे शहरातील साक्री रोडवरील अग्रसेन शाळेजवळ असलेल्या सुंदरच कॉलनीत दत्तमंदिराशेजारी नुकताच हळदीकुंकवाचा कार्यक्रम कॉलनीतील महिलांच्या वतीनं घेण्यात आला. हल्लीच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जगात आणि विशेष म्हणजे मोबाईलमध्ये प्रत्येक जण हरविलेल्या वातावरणात असताना कुणाला कुणासाठी वेळ देता येणे शक्य होत नाही. जो तो आपल्या दुनियेत व्यस्त आहे. शेजारी राहून लोक पास्ट प्रत्यक्ष न बोलता मोबाईलवरच संवाद साधत आहेत. अशा परिस्थितीत आपलेपण हरवित चाललयाचे दिसत आहे. या परिस्थितीतून काही वेळ



का होईना थोडं बाहेर पडलं पाहिजे. आपल्या माणसांशी बोललं पाहिजे. शेजाऱ्यापाजाऱ्यांशी संवाद साधला पाहिजे. नाती आणि संबंध जपण्यासाठी भेटीगाठी झाल्या पाहिजेत या उदात्त भावनेतून आपल्या आजूबाजूला, समाजात अनेक कार्यक्रम होताना आपण पाहत असतो. अगदी हीच धावपळ, धकाधकीची परिस्थिती समाजातील महिला वर्गालाही लागू होते. महिलानीही एकत्र जमले पाहिजे. एकमेकांशी संवाद साधून सुख दु:खे जाणून घेतली पाहिजे. एकमेकांच्या कामी आलं पाहिजे. या भावनेतून महिलांचेही अनेक कार्यक्रम साजरे होत असतात. त्यात सर्वानाच व्यक्त होता येत नाही पण तिथे हजेरी मात्र लागत असते. सर्वांनाच व्यक्त होता यावं, कार्यक्रमात सहभागी होऊन आनंद घेता यावा. महिलांनी एकत्र येऊन आपले मन मोकळे करावे. सामूहिक नाचगाणी करावीत असा महिलांचा हक्काचा कार्यक्रम म्हणजे हळदीकुंकू होय. हल्लीच्या सुपरफास्ट युगातही आज हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाचं महत्व समाजात टिकून आहे. या कार्यक्रमात महिलांना हक्काचा विचारमंच मिळतो. आपल्या कलागुणांना अभिव्यक्त करण्याची संधी मिळते. सर्वांच्या भेटीगाठी होतात. म्हणून हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाला समाजात महत्व आहे. असा हा महिलांच्या आनंदाचा, उत्साहाचा, जल्लोषाचा हळदीकुंकवाचा कार्यक्रम धुळे शहरातील साक्री रोडवरील अग्रसेन शाळेजवळ दत्तमंदिराशेजारी मोठ्या उत्साहात नुकताच पार पडला. या कार्यक्रमाला आलेल्या महिला अगदी छान छान आकर्षक रंगीबेरंगी आणि चमचमीत साड्या परिधान करून, नटूनथटून सहभागी झाल्या होत्या. काही महिलांसोबत त्यांची लहान बालकेही आली होती. सरावाने मिळून हळदीकुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला. त्याचबरोबर म्युझिक, मस्ती, नाचगाणी सादर करीत फुल टु कार्यक्रम आनंदाने एन्जॉय केला. सुंदरच कॉलनीत झालेल्या या सुंदर कार्यक्रमाचं आयोजन रुपाली अजबे-बर्डे. उमा बागुल, स्वाती अजबे, स्वाती सुर्वे, अलका सोनवणे, मानसी भामरे, भामरे मावशी, कविता अजबे, हर्षदा अजबे, विद्या अजबे, नमिता, सरिता थोरात, छाया पगारे, ज्योती परदेशी, वर्षा पिवाल यांनी केलं होतं. या सुरेख आयोजनाबद्दल आयोजक महिलांचं सर्व उपस्थित महिलांनी कौतुक केलं.

# बालकांना ३ मार्चला देणार पोलिओ लस : जिल्हाधिकारी

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात एकूण एक लाख ८८ हजार ४७० बालकांना रविवारी ३ मार्चला पोलिओ लस देण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत एकही बालक वंचित राहू नये यासाठी पोलिओ लसीकरणाचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे, अशी सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी यंत्रणेला दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जिल्हा कार्यबल समितीची बैठक झाली.

श्री. गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी हेमंत भदाणे, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सचिन बोडके. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सोनिया बागडे, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ. तरन्नुम पटेल, साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. बी. मोरे, जिल्हा हिवताप अधिकारी अ. रा. पाटील, महापालिकेचे आरोग्याधिकारी डॉ. एम. आर. शेख यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गोयल यांनी सांगितले, की केंद्र सरकारने पोलिओ निर्मूलनासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन टप्पा २ अंतर्गत जलरथाचे उदघाटन

## जलरथच्या योगदानाबाबत भारतीय जैन संघटनेचे आभार मानतो : पालकमंत्री दादा भुसे















नाशिक । फडणवीस साहेब असा माणूस आहे की, आम्हाला ओढून आणले आणि घड्याळही बंद केले. विनाकागदाचा बोलणारा नेता म्हणजे फडणवीस आहे, यांच्या डोक्यात १५-२० कॉम्प्युटर आहे असं वाटते, सभागृह गोल फिरवून टाकतात, असे वक्तव्य मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन टप्पा २ अंतर्गत जलरथ उद्घाटन सोहळा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिकच्या कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा हॉल येथे पार पडला. यावेळी गुलाबराव पाटील बोलत होते. मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री दादा भुसे हे देखील कार्यक्रमात उपस्थित होते. फडणवीस साहेब तुमचे आभार मानतो. जलरथ उद्घाटनासाठी संधी तुम्ही उपलब्ध करून दिली. शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले तर अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. मध्यंतरीच्या काळात मागचे अडीच वर्ष जलयुक्तचे काम झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. डिझेलसाठी डीपीडीसीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. थेंब आणि थेंब वाया जाणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे. जलरथच्या योगदानाबाबत भारतीय जैन संघटनेचे आभार मानतो, असे पालकमंत्री दादा भुसे म्हणाले.

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# पोलीस ठाण्यात नागरिकांना भीती नाही तर न्याय मिळावा

## नाशिकमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन















नाशिक ।
यावेळी भाषण करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सातपूर पोलीस स्टेशनची आधुनिक आणि सुसज्ज इमारत तयार केली आहे. इंग्रज काळात पोलीस दल शासनासाठी आज पोलीस दल नागरिकांची सेवा करण्यासाठी आहे. पोलीस ठाण्यात नागरिकांना भीती नाही तर न्याय मिळावा हा आमचा प्रयत्न आहे. पोलीस ठाण्याच्या आकृतीबंधासाठी नवीन नियम, पोलीस स्टेशनही वाढवण्यात येतील. सीसीटीएनएस प्रणालीच्या माध्यमातून सर्व कामकाज ऑनलाईन झाले आहे. कोणालाही एफआयआरमध्ये बदल करता येत नाही. नुसती चांगली बिल्डिंग करून फायदा नाही, पीआयला सांगतो ईथे कामही चांगल व्हायला पाहिजे. कामही सुंदर केले पाहिजे. नाशिकचे सीपी चांगले काम करतायत, गुंड गुंडगिरी करणार नाही, यासाठी ते काम करतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली आहे. सातपूर पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीमध्ये सुसज्ज अत्याधुनिक दर्जाच्या सोयीसुविधा आहेत. वरिष्ठ निरीक्षकांसह अधिकारी वर्गासाठी स्वतंत्र दालन, अंमलदार व तक्रारदारांसठीची स्वतंत्र दालन आहे. इमारत ही दुमजली असल्याने पोलिसांच्या कामाकाजाच्या दृष्टीकोनातून विभागवार सोयी उपलब्ध केलेल्या आहेत.